# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- १८ एप्रिल २०१५

- **मुंबई विद्यापीठात स्थापन होणार सेंटर फॉर रेल्वे रिसर्च**
- **भारतीय रेल्वे आणि मुंबई विद्यापीठात शैक्षणिक सामंजस्य करार**
- **रत्नागिरी उपकेंद्रामध्ये स्थापन होणार रेल्वे संशोधन केंद्र**

रेल्वे  संशोधन केंद्रातील संशोधनाची क्षेत्रः

- हेवी हॉल टेक्नॉलॉजी
- व्हेईकल डायनामिक्स
- हाय स्पीड टेक्नॉलॉजी
- एनर्जी एफिशिएंट ट्रॅक्शन पॉवर सप्लाय सिस्टम
- ट्रॅक रिसर्स
- युज ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजेंस फॉर प्रीडेक्टीव्ह मेंटेनंस अँड मॅनेजमेंट
- मटेरिअल सायन्सेस फॉर रेल्वे रिलेटेड कम्पोझिट्स इन्क्लुडिंग रबर्स,पॉलिमर्स अँड इन्सुलेशन मटेरिअल्स
- डेव्हलपमेंट ऑफ इंटिग्रेटेड/ एम्बेडेड प्रोसेसर फॉर रेल्वे एप्लीकेशन्स
- एप्लीकेशन्स फॉर एक्सेस कंट्रोल,सिक्युरिटी अँड सेफ्टी इन्क्लुडिंग बायोमेट्रीक्स
- ओपन प्लॅटफॉर्म प्रपोल्शन कंट्रोल सिस्टम फॉर रेल व्हेईकल
- नॉन कन्व्हेंशनल ड्राईव्हस अँड टेक्नॉलॉजी इन्क्लुडिंग मॅग्लेव,एलआयम
- रिमोट सेंसिंग अँड मेजरमेंट ऑफ ओएचई,ट्रॅक अँड सिग्नल्स

मुंबई - कौशल्याआधारीत शिक्षण आणि नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी नेहमी अग्रेसर असलेल्या मुंबई विद्यापीठात लवकरच सेंटर फॉर रेल्वे रिसर्च (रेल्वे संशोधन केंद्र)स्थापन केले जाणार आहे.मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उप केंद्रामध्ये हे रेल्वे संशोधन केंद्र उभारले जाणार आहे.या रेल्वे संशोधन केंद्राच्या माध्यमातून पदवी,पदव्युत्तर आणि पीएचडी चे अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.आज मुंबई विद्यापीठ आणि भारतीय रेल्वे यांच्यात राजभवन येथे सामंजस्य करार करण्यात आला.

या करान्वये मुंबई विद्यापीठात स्थापन होणा-या रेल्वे संशोधन केंद्रामध्ये भारतीय रेल्वेसाठी लागणारे प्रगत आणि विकसीत तंत्रज्ञान पुरविले जाणार आहे.तसेच या क्षेत्रात संशोधनाला चालना देऊन अधिकाअधिक विकसीत तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतीय रेल्वेचे क्षेत्र व्यापक करण्यावर भर देण्यात

येणार आहे.त्याचप्रमाणे अधिकाअधिक विद्यार्थ्यांना रेल्वे संशोधन प्रकल्पात समाविष्ट करुन रेल्वे तंत्रज्ञानाशी निगडीत अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.

भारतीय रेल्वेच्या व्हिजन -२०२० उपक्रमाअंतर्गत रेल्वेला कुशल मनुष्यबळ आणि तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षणक्रम आणि रेल्वेच्या गरजानुसार संशोधनाला चालना मिळण्यासाठी भारतीय रेल्वेने उच्च शिक्षणात रेल्वेशी निगडीत तंत्रज्ञान विकसीत करण्यावर भर दिला आणि याच अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी शैक्षणिक सहकार्य करत सामंजस्य करार करण्यात आला.

मा.राज्यपाल, महाराष्ट्र आणि कुलपती मुंबई विद्यापीठ, चे.विद्यासागर राव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राजभवन येथील दरबार हॉल येथे हा ऐतिहासिक सोहळा पार पडला.या ऐतिहासिक सोहळ्याला मा.सुरेश प्रभू,रेल्वे मंत्री,भारत सरकार,मा.मनोज सिन्हा ,रेल्वे राज्यमंत्री,मा.विनोद तावडे,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,महाराष्ट्र,मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.राजन वेळूकर,प्र-कुलगुरु, डॉ.नरेश चंद्र,बीसीयुडी संचालक,डॉ.राजपाल हांडे,कुलसचिव,डॉ.एम.ए. खान आणि भारतीय रेल्वेतील अधिका-यांची उपस्थिती लाभली होती.

याप्रसंगी मा.राज्यपाल आणि कुलपती चे. विद्यासागर राव बोलतांना म्हणाले की,मुंबई विद्यापीठ आणि भारतीय रेल्वे यांच्यातील हा शैक्षणिक सामंजस्य करार एक ऐतिहासिक क्षण असून भारतातल्या दोन महत्वपूर्ण आणि अग्रणी संस्था एका अभिनव आणि नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी एकत्र येत आहेत.ते पुढे बोलतांना म्हणाले की ,रेल रोड टेक्नॉलॉजीवर आधारीत पदव्युत्तर शिक्षणक्रम आणि साश्वत संसोधन व नाविण्यता ही काळाची गरज असून या धर्तीवर विशेष शिक्षणक्रम तयार करण्याची गरज आहे.तसेच या प्रसंगी त्यांनी महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी त्यांच्या नजीकचे रेल्वे स्थानके दत्तक घेऊन महिन्यातील एक दिवस रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेसाठी काढल्यास आपली रेल्वे स्थानके ही अतिशय सुंदर होणार असून पंतप्रधानांच्या स्वच्छ भारत अभियानासाठी विद्यापीठ स्तरावरुन हे स्तूत्य उपक्रम म्हणून नावारुपाला येणार असल्याचा आशावाद त्यांनी या वेळी व्यक्त केला.तसेच मुंबई विद्यापीठामध्ये स्थापन होणा-या रेल्वे संशोधन केंद्राच्या धर्तीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात असेच रेल्वे संशोधन केंद्र उभारावे असे आवाहनही त्यांनी यावेळी रेल्वे मंत्री मा. सुरेश प्रभू यांना केले.मुंबई विद्यापीठात स्थापन होणा-या  या केंद्राला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी रेल्वे मंत्री,मा.सुरेश प्रभू बोलतांना म्हणाले की,भविष्यकालीन गरजा पूर्ण करण्यासाठी हे रेल्वे संशोधन केंद्र स्थापन  करण्यात येत असून,भारतीय रेल्वेचा जागतिक दर्जा टिकवून ठेवण्यासाठी हे उपक्रम हाती घेण्यात येत आहे. कुशल आणि प्रभावी तंत्रज्ञानाची जोड धरत मनुष्यबळ विकासाला आणि संशोधनाला चालना मिळावी यासाठी संशोधनावर अधिक भर दिला जाणार आहे. या उपक्रमाच्या मदतीने काळाच्या गरजेनुसार भारतीय रेल्वेच्या विकासात आमुलाग्र बदल घडविण्यास मदत होणार आहे.

तर रेल्वे राज्यंत्री मा.मनोज सिन्हा बोलतांना म्हणाले की,देशातील दोन ऐतिहासिक आणि अग्रणी संस्था मिळून हा शैक्षणिक सामंजस्य करार करीत आहेत आणि हा एक ऐतिहासिक क्षण असून एक सुवर्ण अध्यायाची सुरुवात होत आहे.रेल्वे अर्थसंकल्पामध्ये ४ नविन विद्यापीठ स्थापन करण्यावर भर दिला गेला असून रेल्वे संशोधन केंद्राच्या माध्यमातून भारतीय रेल्वेचा कायापालट होणार असून हेवी

हॉल टेक्नॉलॉजी, हाय स्पीड टेक्नॉलॉजी या सारख्या महत्वपूर्ण क्षेत्रावर अधिक भर देण्यात येणार आहे.भारतीय रेल्वेला तंत्रज्ञान आणि संशोधनाची  जोड दिल्यास हे क्षेत्र जगात नक्कीच अग्रेसर राहणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून खासदार आणि केंद्रीय मंत्री मा.अनंत गीते बोलतांना म्हणाले की,जागतिक स्पर्धेच्या युगात प्रगत राष्ट्रामध्ये आपल्या देशाचा समावेश व्हावा यासाठी रेल्वेने स्वतःचे तंत्रज्ञान विकसीत करण्यावर भर द्यायला हवा आणि त्याची सुरुवात आजपासून होत असल्याने हा एक ऐतिहासिक क्षण असून अग्रणी संस्था म्हणून गणल्या जाणा-या मुंबई विद्यापीठ याचे यशस्वी नेतृत्व करित आहे.

तर या प्रसंगी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. विनोद तावडे बोलतांना म्हणाले की,मुंबई विद्यापीठ हे कौशल्याआधारीत शिक्षण आणि नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी नेहमी अग्रेसर असून नव नविन विषयांना नेहमीच प्राधान्य दिले जात आहे.काळाच्या गरजेनुसार विद्यापीठ शिक्षणक्रम तयार करत असून जे-जे नविन क्षेत्र उदयास येत आहे अशा क्षेत्रांचा विचार करुन या क्षेत्रांना संशोधनाची जोड दिल्यास या क्षेत्रात रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की, या रेल्वे संशोधन केंद्रांच्या माध्यमातून जगातल्या रेल्वे विद्यापीठांना एकत्र आणन्यासाठी नेटवर्क तयार केले जाणार असून आंतरराष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून देवाण-घेवाण करण्यावर ही भर दिला जाणार आहे.तसेच आजच्या घडीला जगात जे विकसीत तंत्रज्ञान आहे त्याची जोड या संशोधन केंद्राला देण्यात येणार आहे.नव्याने उदयास येणा-या लाय-फाय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जाणार आहे,नविन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्हर्च्युअल टिकेटिंग या क्षेत्रावरही विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर भाषण मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.नरेशचंद्र यांनी केले,मागील पाच वर्षात विद्यापीठाने महत्वपूर्ण कामगिरी केली असून विद्यापीठाने अनेक नवनविन उपक्रम राबविले आहेत. हे रेल्वे संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उप केंद्रामध्ये सुरु होणार असून त्यानंतर ठाणे आणि कल्याण येथील उपकेंद्रामध्ये सुरु केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

परदेशात रेल्वेला कुशल मनुष्यबळ पुरविणा-या विशेष संस्था आहेत त्याच धर्तीवर हा अभिनव प्रयोग राबवून जागतिकीकरण्याच्या गरजा ओळखून कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी भारतीय रेल्वेने हे महत्वाकांक्षी पाऊल उचलले आहे आणि या अभिनव उपक्रमाला मुंबई विद्यापीठाचे शैक्षणिक सहकार्य लाभणार आहे.

मुंबई विद्यापीठ आणि भारतीय रेल्वे यांच्यातील शैक्षणिक सामंजस्य करार स्वाक्षरी प्रसंगीच्या कार्यक्रमाला विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणातील सदस्य,अधिष्ठाता ,आणि अधिकारीवर्ग उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)